**'RESEARCH JOURNEY'** *International E- Research Journal*
**Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)**
**Special Issue 171 (C)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब**
**UGC Approved Journal**
**ISSN : 2348-7143**
**March -2019**

# भटक्या विमुक्तांच्या समस्या व शासकीय उपाययोजना

**प्रा. बी. बी. घुरके**
सहाय्यक प्राध्यापक
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर
मो.नं. ९४०५८३८९८२
ई-मेल : ghurakebaburao@gmail.com

**प्रा.पी. एस. चौगुले**
सहयोगी प्राध्यापक
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

**सारांश :**

भारतीय समाज चातुवर्ण्याधिष्टीत असून तो अनेक जाती पोटजातींमध्ये विभागलेला आहे. विषमता हे या समाजाचे व्यवच्छेदक वैशिष्टय आहे. भारतात एक जात, धर्म दुस-या जाती धर्मापेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजतात. त्यामुळे जातीअंतर्गत समानतेची, बंधूभावाची, एकात्मतेची भावना निर्माण झाली नाही. अजूनही येथील माणूस जातीत जन्माला येतो, जातीतच जगतो आणि जातीतच मरतो. भारतीय स्वातंत्र्यानंतर भटक्या-विमुक्तांच्या परिस्थितीत सुधारणा होईल अशी अपेक्षा होती परंतु अद्यापर्यंत सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीत फारसा बदल झालेला दिसत नाही. सध्या भारतात एक हजार भटक्या-विमुक्तांची पंधरा कोटींच्या आसपास लोकसंख्या असावी असे २००८ चा रेणके आयोग सांगतो. महाराष्ट्रात एकूण ३७ भटक्या जमाती आणि १४ विमुक्त जाती व २०० च्या वर पोटजातींची संख्या आहे. भटक्या-विमुक्तांसाठी असलेल्या विविध विकास योजना आखण्यात आल्या. परंतु ख-या अर्थाने विकास आजही साध्य झालेला नाही. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात भटक्या जमाती व विमुक्त जातींच्या समस्या आणि उपाययोजना यांचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

**प्रस्तावना:**

भारतीय स्वातंत्र्यानंतर १९५२ ला लोकसभेच्या पहिल्या निवडणूकीदरम्यान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी ब्रिटीश सरकारचा गुन्हेगारी कायदा रदद केला आणि २३ ऑगस्ट १९६० ला हजारो भटक्या-विमुक्तांच्या उपस्थितीत सोलापूर येथील सेटलमेंटचे तीन तारेचे कुंपण तोडून कुंपणातील गुन्हेगार जमातींना मुक्त केले. त्या दिवसापासून या जमाती 'विमुक्त' या नावाने घोषित करण्यात आल्या. उदरनिर्वाहासाठी ज्या जमाती सतत भटकंती करीत असतात त्यांना 'भटक्या जमाती' या नावाने ओळखले जाते.

भटक्यांना गुन्हेगार, चोर, भिकारी आणि उपेक्षित म्हणून हिणवले जात असले तरी भटके भारतात कधी काळी राज्यकर्ते प्रस्तुत सरदार, शूरवीर सैनिक होते अस ऐतिहासीक पुरावे आढळतात.उदा. अहिल्यादेवी होळकर, मल्हारराव होळकर, उमाजी नाईक इ. नामोल्लेख करता येईल.

सामाजीक व्यवस्थेची सुरवात करणारा समाज आज विविध कारणांनी आपला विकास करू शकला नाही आणि अनेक समस्यांनी ग्रस्त असलेला पाहावयास मिळतो. जगातील बहुतेक देशात भटके-विमुक्त समुदाय अस्तित्वासाठी संघर्ष करीत असताना पाहावयास मिळतात. भटक्या-विमुक्तांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक आणि आरोग्यविषयक स्थितीचा अभ्यास करताना त्यांच्या समस्या जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

**उद्दिष्टयेः**

१. भटक्या विमुक्तांची ऐतिहासीक पार्श्वभूमी जाणून घेणे.

२. भटक्या विमुक्तांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

३. भटक्या विमुक्तांच्या विकासासाठी उपाययोजना सुचवणे.

**संशोधन पद्धतीः**

प्रस्तुत शोधनिबंधात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. टथ्य संकलन प्रस्तुत संशोधनात दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे. यामध्ये पुस्तके, मासिके व इंटरनेट चा उपयोग केला आहे.

**भटक्या जमाती व विमुक्त जातींची ऐतिहासीक पार्श्वभूमीः**

सुमारे दोन हजार वर्षापूर्वीपासून आर्य टोळयांचे हिंदुस्थानावर आक्रमण सुरू झाले. असे आक्रमण अंदाजे आठशे ते नऊशे वर्षे चालू होते. आर्य बलवान व क्रुर होते. आर्य येण्यापुर्वी भारतात द्रविड लोकांच्या वसाहती होत्या. द्रविड लोक नदीवर कालवे काढून उत्तम शेती करत. तुलनेने आर्यापेक्षा चांगले जीवन जगत होते. आर्यांच्या आक्रमणामुळे या भटक्या टोळया तयार झाल्या. भटक्या जमातींची भटकंती उत्तर व दक्षिण भारतभर चालू होती. कालांतराने हया भटक्या जमातीपैकी काही जमाती गुन्हेगारी करू लागल्या. अशा जमातींचे चोरी हे उपजिवीकेचे साधने झाले. त्यांचा नागरी वस्त्यांना उपद्रव होऊ लागला. त्यानंतर इंग्रज भारतात आले. त्यांना समाजात शांतता व ब्रिटीश सत्तेत स्थानिक लोकांचा पाठिंबा पाहिजे होता. म्हणुन ब्रिटिश सरकारने १८७१ साली गुन्हेगार जमातीविषयी कायदा केला. या कायदयाने गुन्हेगार जमाती जखडून टाकल्या. सुमारे ८१ वर्षे या कायद्याचा अंमल चालू होता. त्यामुळे या गुन्हेगारी जमातींची स्थिती दयनीय झाली. भारत स्वतंत्र झाल्यावर भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी सेटलमेंटच्या तारा तोडल्या व या गुन्हेगार जमातींना मुक्त केले. त्यांच्यावरील जन्मजात असलेला गुन्हेगारीचा कलंक पुसून टाकला. इतर निर्बंध दूर झाले. या गुन्हेगार जमातींना विमुक्त म्हणून कायदेशीर मान्यता मिळाली.

**भटक्या-विमुक्तांच्या समस्याः**

**अ) सामाजिक समस्या-**

इतर समाज भटक्या जमातीला व विमुक्त जातीला हलक्या दर्जाचा समजतो, अस्पृश्य समाज देखील भटक्या जमाती व विमुक्त जातीला अस्पृश्य मानतो. बहुतांश पुरूष निरक्षर व अज्ञानी आहेत त्यामुळे दारू, मटका, जुगार आणि नाचगाणी अशा व्यसनाने पछाडलेले आहेत. स्त्रिला उपभोगाची वस्तु म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. भटक्या जमाती व विमुक्त जातीमध्ये बहुतेक सर्वत्र पितृसत्ताक पदधत आहे. आपआपसातील भांडणतंटे मिटवण्यासाठी जातपंचायती आहेत. अनेक ठिकाणी बालविवाह केले जातात.

**ब) धार्मिक समस्या-**

देवळात लग्ने लावण्याची पद्धत अलिकडे वाढू लागली आहे. काडीमोड, सोडचिठठी असे घटस्फोटांचे प्रकार भटक्या-विमुक्त जमातींमध्ये आहेत. बहुतेक सर्वत्र पुनर्विवाहाची पद्धत आहे. पाहुणचार मटणाच्या जेवणाचा असतो. भटके-विमुक्त देवाला फार मानतात. अनेक स्त्री-पुरूषांच्या देवदेवता अंगात येतात. देवाच्या कोपावर त्यांचा विश्वास आहे. खंडोबा, म्हसोबा, बिरोबा, वेताळ मरीआई इ. देवदेवतांची ते पुजा प्रार्थ ना करतात. देवाला नवस बोलण्याची प्रथा असून कोंबडया, बकरी मारून नवस फेडतात. या समजात देव

ISSN : 2348-7143
March -2019

घालणे, करणी करणे, मुठ करणे यासारखे अघोरी प्रकार चालू असतात. भूताखेतावर या समाजाचा विश्वास असून त्यावर उतारा देण्याची पद्धत आहे.

**क) आर्थिक समस्या-**

भटक्या जमाती व विमुक्त जातींमध्ये अजूनही दारिद्रय आढळते. कर्जबाजारीपणा, शोषण, वेठबिगारी, कामगारांचे प्रश्न, फसवणूक, विस्थापन, धुणी भांडी करणे, गवंडीकाम करणे, तांबटकाम, सेंट्रिंग, बिगारी, मोलमजूरी करणे, फिरून भांडी विकणे तसेच भंगार गोळा करणे, भांडयांना कल्हई करणे, गवताच्या काडयांपासून खेळणी बनवणे, नंदी बैलाचा खेळ करणे, दोरी व बांबुवरील शारीरिक कसरती करणे इ. कामे भटक्या विमुक्त जमातीचा समाज करत असतो त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती मजबूत नसते.

**ड) शैक्षणिक समस्या-**

शाळेतील गळती, माध्यमांचा प्रश्न, साक्षरतेचे अल्प प्रमाण, शिक्षणाबाबतची अनास्था, वाडयावस्त्यांवर विखुरलेला समाज, दळणवळणाच्या अभावी शिक्षणाचे प्रमाण कमी, मुख्य गावापासून दुरवर शाळा, शिक्षक, शालेय साहित्य इ. संबंधिचे प्रश्न निरक्षरता, अपर्याप्त शैक्षणिक सुविधा व जागृतीचा अभाव इ. समस्या भटक्या विमुक्तांना भेडसावतात.

**इ) शेतीविषयक समस्या-**

बदलती कु-हाड शेती, आधुनिक तंत्राच्या मर्यादा, शेतीसंबंधित कर्जे, नैसर्गिक आपत्ती, शेतमालाच्या विपणनाचा प्रश्न, शेतीसंबंधी महसुल खात्याचे प्रश्न, जमिनी हस्तांतरणाविषयी प्रश्न, अल्प भूधारकता इ. शेतीविषयक समस्या भटक्या विमुक्तांना भेडसावतात.

**ई) आरोग्यविषयक समस्या-**

नैसर्गिक वातावरण, निसर्गाच्या सानिध्यातील जीवन, वनस्पती व फळांची उपलब्धता, रासायनिक पदार्थाचा वापर न करणे असे असले तरी भटक्या विमुक्तांना आरोग्याच्या समस्यांनी ग्रासलेले दिसून येते. रोजगाराचा अभाव, आरोग्याच्या सुविधांचा अभाव, व्यसनाधिनता, अंधश्रदधा, शासनाचा उदासीन दृष्टिकोन यामुळे आरोग्याच्या समस्या अत्यंत गंभीर झाल्या आहेत.

**भटक्या-विमुक्तांच्या विकासासाठी व समस्यांवर उपाययोजना -**

भटक्या जमाती व विमुक्त जातीची भटकंती थांबवून त्यांना जर स्थैर्य देवून चांगले जीवनमान जगण्यासाठी त्यांच्यासाठी काही उपाययोजना करून शासनाने याबाबतीत पुढाकार घेणे गरजेचे आहे.

**उपाययोजनाः**

१. भटक्या विमुक्तांची जनगणना करावी.
२. भटक्या विमुक्तांच्या पूनर्वसन वसाहती स्थापन कराव्यात.
३. भटक्या विमुक्तांच्यासाठी उद्योगकेंद्रे स्थापन करावीत.
४. भटक्या विमुक्त स्त्री पुरूषांना साक्षर करून प्रवोधन करणे गरजेचे आहे.
५. भाषेचा अडसर दूर करणे.
६. भटक्या विमुक्तांची मुले दत्तक घ्यावीत.
७. भटक्या विमुक्त विद्यार्थ्यांसाठी शाळांमध्ये खास सल्लागार असावा.

८. भटक्या विमुक्त विद्यार्थ्यासाठी हस्तकलेत प्रोत्साहना दयावे.
९. भटक्या विमुक्त विद्यार्थ्यांसाठी मासीक शिष्यवृत्ती दयावी.
१०.मानवी विकासाचा आर्थिक निर्देशांक ठरवून शासकीय सवलतींमध्ये बदल घडविणे आवश्यक आहे.
११. भटक्या विमुक्तांच्यासाठी अल्पदरात शासनाने आरोग्याच्य सुविधा पुरवाव्यात.
१२. आधुनिक शेतीविषयी मार्गदर्शक कार्यशाळा आयोजीत कराव्यात.

**शासनाच्या सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विकासाच्या विविध योजनाः**

१. प्राथमिक व माध्यमिक निवासी आश्रमशाळांना सहाय्यक अनुदान
२. विद्यानिकेतन चालवण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान
३. उसतोड कर्मचा-यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी निवासी आश्रमशाळा
४. भटक्या विमुक्त विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
५. सैनिकी शाळेमध्ये शिक्षणा-या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता
६. भटक्या विमुक्त प्रवर्गाच्या मुला मुलींसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना
७. आद्योगिक प्रशिक्षण संस्थातील भटक्या विमुक्त प्रशिक्षार्थिंना विद्यावेतन योजना
८. तांडा सुधार योजना
९. भटक्या विमुक्त प्रवर्गाच्या लोकांना सहकारी गृहनिर्माण संस्थांचे वित्तीय सहाय्य
१०.माध्यमिक शाळेत शिक्षणा-या भटक्या विमुक्त प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती (गुणवत्ता शिष्यवृत्ती) योजना
११.इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिक्षणा-या भजविजा प्रवर्गच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती

**संदर्भसूचीः**

१. आदिवासी समाजः पश्न आणि आव्हाने - डॉ. जयश्री महाजन व प्रा.सागर बडगे
२. दलितांचे आणि आदिवासींचे समाजशास्त्र - प्रा. पी. खे. कुलकर्णी
३. विमुक्त व भटक्यांची सध्यस्थिती आणि उपाययोजना - डॉ. शैलजा मंडले
४. झा राजेशकुमार (संपादक), योजना(आदिवासी आणि वंचित समाज),जानेवारी २०१४
५. ब्रिजेश सिंह (संपादक), लोकराज्य, ऑगस्ट २०१६